## 14. भारतीय संसद
### भाग V कलम 79 ते 122

- स्वीकार - इंग्लंड
- संसद ही भारतीय शासन व्यवस्थेची कायदेमंडळ म्हणुन ओळखली जाते.
- संसदीय लोकशाही व्यवस्थेमध्ये संसदेची भूमिका ही मध्यवर्ती राहिलेली असून भारताच्या घटनेच्या भाग V आणि कलम 79 ते 122 पर्यंत संसदेने संघटन, रचना, कालावधी, सभापती, अधिकार व विशेषाधिकार इत्यादीची तरतुद करण्यात आली.

**कलम आणि तरतुदी :-**

- **कलम 79** - नुसार भारतासाठी एक संसद असेल जी की, लोकसभा, राज्यसभा आणि राष्ट्रपती यांनी मिळून बनलेली असेल. भारताची संसद प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे 1 मे, 1952 रोजी स्थापन झाली. 1954 मध्ये इंग्लंडमधील House of Lords या सभागृहाच्या धर्तीवर राज्यसभा आणि House of Commons या सभागृहाच्या धर्तीवर लोकसभा अशी हिंदी नावे स्विकारण्यात आली.
- **कलम 80** - राज्यसभेची निर्मिती. या कलमानुसार राज्यसभेची सदस्य संख्या 250 असून ज्यात घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेश यातून 238 आणि राष्ट्रपती मार्फत 12 नामनिर्देशित सदस्यांची नेमणुक केली जाते.

  सध्या, राज्यसभेची सदस्य संख्या 245 असून घटकराज्यातून 225 व केंद्रशासित प्रदेशातून 8 सदस्य निवडुन दिले जातात.
- **कलम 81** - लोकसभेच्या रचनेची तरतुद असून घटनेनुसार लोकसभेची सदस्य संख्या 552 असून त्यापैकी घटकराज्यातून 530 तर केंद्रशासित प्रदेशातून 20 सदस्य व 2 नामनिर्देशित सदस्य राष्ट्रपती निवडतात. परंतु सध्या 545 एवढी सदस्य संख्या असून 524 सदस्य घटकराज्यातून तर 19 सदस्य केंद्रशासित प्रदेशातून निवडुन दिले जातात. 2 अँग्लो इंडियन सदस्य निवडण्याची परंपरा 104 व्या घटनादुरुस्ती 2020 नुसार रद्द करण्यात आली आहे.
- **कलम 82** - प्रत्येक जनगणनेनुसार मतदार संघाची विभागणी. 543 पैकी सर्वसाधारण 412, अनुसूचित जाती 84, अनुसूचित जमाती 47 एवढे मतदारसंघ आहेत.

  2008 च्या पुर्नरचनेनंतर आरक्षित जागांची सद्यस्थिती -
- **SC -**
  1. 543 पैकी 84 (20 राज्ये व केंद्र प्रदेश मधील)
  2. सर्वाधिक UP मध्ये (80 पैकी 17)
  3. महाराष्ट्रात 48 पैकी 5 (अमरावती, शिर्डी, रामटेक, लातूर सोलापूर)
- **ST -**
  1. 543 पैकी 47 जागा (17 राज्ये व केंद्र शासित प्रदेश)
  2. सर्वाधिक आरक्षित जागा मध्यप्रदेशमध्ये (29 पैकी 6)
  3. महाराष्ट्रात - 48 पैकी 4 (नंदूरबार, गडचिरोली-चिमूर, दिंडोरी, पालघर)
- **कलम 83** - राज्यसभा व लोकसभेच्या कालावधीची तरतूद.

**1) राज्यसभेचा कालावधी**

- सदस्यांचा पदावधी घटनेने निश्चित केलेले नसून तो अधिकार संसदेस आहे, त्यानुसार संसदेने लोकप्रतिनिधीत्व कायदा 1951 संमत करून 6 वर्षे निश्चित केला

**2) लोकसभेचा कालावधी -**

- सामान्य कालावधी 5 वर्षे
- तत्पुर्वी राष्ट्रपती हे पंतप्रधानाच्या सल्ल्याने लोकसभा विसर्जित करू शकतात तर राष्ट्रीय आणिबाणी दरम्यान लोकसभा कार्यकाळ एक वर्षाने वाढविता येतो, असा तो कितीही वेळा वाढविता येतो मात्र आणिबाणी संपुष्टात आल्यानंतर 6 महिन्यापेक्षा जास्त वाढविता येत नाही.
- **कलम 84** - संसद सदस्यत्वासाठीची पात्रता.
  1. राज्यसभेसाठी 30 वर्षे पूर्ण तर लोकसभेसाठी 25 वर्षे पूर्ण असावेत.
  2. संसदेने कायद्याने वेळोवेळी विहित केलेल्या पात्रता धारण केलेल्या असाव्यात
- **कलम 85** - संसदेचे अधिवेशने बरखास्ती व विसर्जन.
- **कलम 86** - राष्ट्रपतीचे अभिभाषण तयार करुन निरोप पाठविण्याचा अधिकार.
- **कलम 87** - राष्ट्रपतींचे विशेष अभिभाषण.
- **कलम 88** - संसदेच्या सभागृहासंबंधीत मंत्री व म[illegible] हक्क.
- **कलम 89** - राज्यसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड.
  1. राज्यसभेच्या अध्यक्षाची निवड लोकसभा व राज्यसभेचे सदस्य करतात तर उपाध्यक्षाची निवड राज्यसभेचे निवडून आलेले सदस्य आपल्यामधून एकाची करतात.
- **कलम 90** - राज्यसभेच्या उपाध्यक्षाचे पद रिक्त होणे, राजीनामा देणे किंवा बडतर्फ करणे.

1. राज्यसभेचा उपाध्यक्ष आपला राजीनामा अध्यक्षाकडे देऊन पदमुक्त होतो.

- **कलम 91** - अध्यक्षाच्या अनुपस्थितीमध्ये उपध्याक्षाचे अध्यक्ष म्हणुन कार्य करण्याचे अधिकार.
- **कलम 92** - राज्यसभा अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना पदावरुन दूर करण्याच्या बैठकीच्या अध्यक्ष स्थानाविषयीची तरतूद.
- **कलम 93** - लोकसभेचे सभापती आणि उपसभापती.

1. लोकसभेचे निवडून आलेले सदस्य आपल्यामधून एकाची सभापती व उपसभापती म्हणून निवड करतात.

- **कलम 94 -** लोकसभेचे सभापती आणि उपसभापती यांचे पदे रिक्त होणे, राजीनामा किंवा पदावरुन दूर करण्याविषयीची तरतूद.

1. लोकसभा सभापती - उपसभापती यांना पदावरून दूर करण्यासाठी 14 दिवसांची पूर्वसूचना देवून 50 सदस्यांची स्वाक्षरी घेवून 2/3 बहूमताने ठराव मंजुर केल्यास पदावरून दूर व्हावे लागते.

- **कलम 95 -** लोकसभेच्या सभापती अनुपस्थितीमध्ये उपसभापतीची सभापती म्हणुन कार्य करण्याविषयीचे अधिकार.
- **कलम 96 -** लोकसभा सभापती व उपसभापतींना पदावरुन दूर करण्याच्या बैठकीच्या अध्यक्षा स्थानासंबंधी तरतूद.
- **कलम 97 -** राज्यसभा अध्यक्ष, उपाध्यक्ष व लोकसभा सभापती, उपसभापती यांचे वेतन व भत्ते.
- **कलम 98 -** संसदेचे सचिवालय.
- **कलम 99 -** संसद सदस्यांचे शपथविधी व प्रतिज्ञा.
- **कलम 100 -** संसद सभागृहामधील मतदान, पदे रिक्त असेल व गणसंख्या नसेल तरीही कामकाज चालविण्याविषयीचा अधिकार.

1. लोकसभा व राज्यसभेचे अध्यक्ष सभागृहाची गणसंख्या निश्चित करतात. सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या 1/10 एवढी गणसंख्या निश्चित केली जाते म्हणजे. लोकसभा किमान 55 सदस्य (अध्यक्षासह) तर राज्यसभा किमान 25 सदस्य (अध्यक्षासह)

- **कलम 101 -** संसद सदस्याचे पद रिक्त होणे बाबत.

    1. संसदेच्या दोन्ही सदनाचा एकाच वेळी एखादी व्यक्ती सदस्य असू शकणार नाही.

    i) एका सभागृहाचा सदस्य दुसऱ्या सभागृहात निवडून गेल्यास पहिल्या सभागृहातील जागा रिक्त होईल.

    ii) एका सदनाच्या दोन जागेवर निवडून आलेल्या व्यक्तींनी सात दिवसाच्य आत एका जागेची निवड करणे गरजेचे असते अन्यथा दोन्ही जागा रिक्त होतात.

    iii) राज्य विधीमंडळाचा सदस्य संसदेत निवडून गेल्यास 14 दिवसाच्या आत राज्यविधीमंडळ सदस्यांना राजीनामा द्यावा लागतो अन्यथा संसदेचे सदस्यत्व रद्द होते.

- **कलम 102 -** संसद सदस्याच्या अपात्रतेचे निकष.

    1. सक्षम कोर्टाकडून मनोरूग्ण घोषित.
    2. कर्जबुडव्या दिवाळखोर असेल.
    3. तिचे भारताचे नागरिक असणे संपले असेल.
    4. संसदेने केलेल्या कायद्याद्वारे अपात्र ठरविली गेली असेल आणि पक्षांतर केल्याच्या सबबीवर अपात्र ठरली असेल.

- **कलम 103 -** संसद सदस्याच्या अपात्रतेच्या प्रश्नावर निर्णय राष्ट्रपती देतील.
- **कलम 104 -** कलम 99 नुसार शपथ घेण्यापूर्वी किंवा पदावरुन दूर केल्यानंतर सदस्यांचे सभागृहात उपस्थित राहणे किंवा मतदान करणे याबद्दलचा दंड.

    1. शपथ घेण्यापूर्वी किंवा सदस्यत्व रद्द झाल्यास एखादा सदस्य सभागृहात उपस्थित राहत असेल तर प्रतिदिन 500 रू. दंड आकारण्यात येतो.
    2. एका सभागृहातील सदस्य दुसऱ्या सभागृहात उपस्थित राहत असेल तर 5000 रू. प्रतिदिन दंड आकारण्यात येतो.

- **कलम 105 -** संसदेची सभागृह, त्यांचे सदस्य आणि त्यांच्या समित्या याविषयीची अधिकार व विशेषाधिकार.
- **कलम 106 -** सदस्यांचे वेतन व भत्ते.
- **कलम 107 -** संसदेचे विधेयक सादर करणे व संमत करणे यासंबंधीच्या तरतुदी.
- **कलम 108 -** संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक.

1. राष्ट्रपती पंतप्रधानाच्या सल्लाने लोकसभा व राज्यसभा संयुक्त अधिवेशन बोलावतात.
2. आत्तापर्यंत संसदेचे तीन वेळेस संयुक्त अधिवेशन बोलावण्यात आले असून या अधिवेशनाचे अध्यक्ष लोकसभेचे अध्यक्ष असतात.

    i) हुंडा प्रतिबंधक कायदा 1961

    ii) बँक सर्व्हिस बिल कमिशन 1978

    iii) दहशतवाद विरोधी कायदा 2002


- **कलम 109 -** अर्थ किंवा धनविषयक विधेयकाबाबतीत विशेष प्रक्रिया.
- **कलम 110 -** धनविषयक विधेयकाची व्याख्या.
- **कलम 111 -** संसदेने मंजूर करुन पाठवलेल्या विधेयकांना मंजुरी देण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार.
- **कलम 112 -** वार्षिक वित्तीयपत्रकासंबंधी.
- **कलम 113 -** अंदाजपत्रकाबाबत संसदेची कार्यपद्धती.
- **कलम 114 -** संसदेची विनियोग विधेयकाबाबतची तरतूद.
- **कलम 115 -** संसदेची पुरक, अतिरिक्त आणि जास्तीचे अनुदान मंजुर करण्याची प्रक्रिया.
- **कलम 116 -** संसद लेखानुदान, प्रत्ययानुदान व अपवादात्मक अनुदान मंजुरीची प्रक्रिया.
- **कलम 117 -** वित्तीय विधेयकाबाबत विशेष तरतूद.
- **कलम 118 -** संसद प्रक्रियेचे नियमन.
- **कलम 119 -** वित्तीय कामकाजासंबंधी संसदेतील प्रक्रियेचे कायद्याद्वारे नियमन.
- **कलम 120 -** संसदेच्या दोन्ही सभागृहात वापरावयाची भाषा.

1. संसदेचे कामकाज हिंदी व इंग्रजी या भाषेतून चालत असले तरी सभागृहाचे अध्यक्ष सदस्यांना मातृभाषेतून प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करून देतात.
2. संसदेच्या दोन्ही सभागृहात 12 भाषेतून व्यक्त केलेले विचार तात्काळ हिंदी व इंग्रजी मध्ये भाषांतर करून देण्याची व्यवस्था करून देण्यात आली आहे.

- **कलम 121 -** संसदेतील सदस्यांनी केलेल्या चर्चेवरील निर्बंध.
- **कलम 122 -** संसदेतील कामकाजाबाबत न्यायालयांना चौकशीचा अधिकार असणार नाही.
- लोकसभेच्या रचनेची तरतुद कलम 81
- त्यानुसार, लोकसभेची महत्तम संख्या 552 इतकी ठरविण्यात आली.
- 530 सदस्य राज्यांचे प्रतिनिधी, 20 सदस्य हे केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी, 2 सदस्य राष्ट्रपतीमार्फत अँगलो-इंडियन समाजातून नामनिर्देशित केले जातील. (हे रद्द झाले आहे.)
- मात्र लोकसभेची सदस्यसंख्या 545 आहे. त्यात 524 राज्यांचे प्रतिनिधी, 19 केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी, तर 2 सदस्य अँग्लो-इंडियन समाजातून नामनिर्देशीत केले जातात. (रद्द झाले.)

**लोकसभेच्या आतापर्यंत झालेल्या निवडणुका - 1952 ते 2021**

| क्र. वर्ष | क्र. वर्ष | क्र. वर्ष |
|---|---|---|
| 1 1952 | 2. 1957 | 3. 1962 |
| 4. 1967 | 5. 1971 | 6. 1977 |
| 7. 1980 | 8. 1984 | 9. 1989 |
| 10. 1991 | 11. 1996 | 12. 1998 |
| 13. 1999 | 14. 2004 | 15. 2009 |
| 16. 2014 | 17. 2019 | |




### Electronic Voting Machine -

- या मशीनचा शोध 1868 मध्ये अमेरिकेत एडिसन या शास्त्रज्ञाने लावला.
- भारतात या मशिनचा शोध एम.बी. हनीफा यांनी 1980 मध्ये लावला.
- प्रथम या मशीनचा वापर 1980 मध्ये केरळच्या 50 विधानसभा मतदार संघासाठी झाला.
- 2004 च्या 14 व्या लोकसभेत संपूर्ण भारतात EVM मशीनद्वारे निवडणुका घेण्यात आल्या.
- 2014 च्या 16 व्या लोकसभेत EVM मशीनवर NOTA हे ऑपशन देण्यात आले.
- 2019 च्या 17 व्या लोकसभेत EVM मशीनला जोडून VVPAT हे मशीन जोडण्यात आले.

**राज्याचे प्रतिनिधीत्व**

- उत्तरप्रदेश - 80, महाराष्ट्र -48 व सिक्किम, नागालंड, मिझोराम यांचा प्रत्येकी एक सदस्य.

**केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधीत्व -**

- संसदेने केंद्रशासित प्रदेश (लोकसभेसाठी प्रत्यक्ष निवडणूक) कायदा, 1965 संमत करुन केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधीसुध्दा प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडण्याचे निश्चित करण्यात आले.
- 20 प्रतिनिधींची तरतुद असली तरी 19 प्रतिनिधीच लोकसभेत आहेत. 7 दिल्ली, पाँडेचेरी 1 व जम्मू-काश्मीर 6 उर्वरित प्रत्येक एक के. प्र. प्रतिनिधीत्व आहे.

**नामनिर्देशित सदस्य -**

- घटनेच्या कलम 331 अंतर्गत राष्ट्रपतींना अँग्लो-इंडियन समाजातील 2 प्रतिनिधीत्व मिळालेले नाही तर लोकसभेवर नामनिर्देशित करता येतात. सुरुवातीला हि तरतुद 10 वर्षासाठी (1960) नंतर तो 10 वर्षांनी वाढविण्यात आली. सध्या 95 वी घटनादुरुस्ती 2009 द्वारे 2020 पर्यंत वाढविण्यात आली. (रद्द)

**लोकसभा निवडणुक व्यवस्था**

**1) प्रादेशिक मतदारसंघ रचना :**

- राज्याराज्यांमधील प्रतिनिधीत्वाची समरुपता साध्य करण्यासाठी
- एका राज्यातील मतदारसंघामध्ये प्रतिनिधीत्वाची समरुपता साध्य करण्यासाठी.

**2) प्रत्येक जनगणनेनंतर पुनर्रचना**

- लोकसभेतील जागांची राज्यांना दिलेली वाटणी
- प्रत्येक राज्याची प्रादेशिक मतदारसंघामध्ये केलेली विभागणी.
- 84 वा घटनादुरुस्ती कायदयानुसार लोकसभेतील राज्यनिहाय जागांच्या वाटणीत बदल 2026 नंतरच्या जनगणनेचे आकडे प्राप्त झाल्यानंतरच केला जाईल.
- लोकसंख्येच्या अत्यंत असमान वाढीमुळे लोकसभा मतदारसंघाची पूर्नरचना 2001 च्या नवीन आकडयांच्या आधारे करुन त्यांमध्ये समरुपता साध्य करण्यासाठी ही पूर्नरचना करण्यात आली.
- कलम 330 नुसार लोकसभेतील जागांमध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी आरक्षण आहे.

**लोकसभेचा कालावधी -**

- 5 वर्षे
- 42 व्या घटनादुरुस्तीने 6 वर्षे केला होता पण 44 व्या घटनादुरुस्तीने (1978) तो पुन्हा 5 वर्षे केला.
- राष्ट्रपतीच्या पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार लोकसभा 5 वर्षाच्या आत विसर्जित करु शकतात.
- राष्ट्रीय आणीबाणी दरम्यान लोकसभेचा कार्यकाल संसदीय कायदयाद्वारे एका वेळी एका वर्षाने वाढविता येतो. आणीबाणी संपल्यानंतर सहा महिन्यापेक्षा अधिक काळ लोकसभेचा कालावधी वाढवता येणार नाही. (आत्तापर्यंत पाचव्या लोकसभेचा कार्यकाल वाढला)
- 5 व्या लोकसभेचा कालावधी 5 वर्षे 10 महिने व 6 दिवस इतका ठरला.

**लोकसभेचा अध्यक्ष -**

- नव्याने निवडून आलेल्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनात अध्यक्षांची निवडणूक केली जाते. त्या बैठकीचे अध्यक्षस्थान प्रोटेम अध्यक्षामार्फत भूषविले जाते.
- लोकसभा आपल्या सदस्यांपैकी एकाला अध्यक्ष म्हणून निवड करते.
- 49 वर्षाच्या संसदेच्या इतिहासात प्रथमच 1996 मध्ये 11 व्या लोकसभेचे अध्यक्ष म्हणून पी. ए. संगमा या विरोधी पक्षातील नेत्याची बिनविरोध निवड झाली. 23 मे 1996 ते 23 मार्च 1998 कार्य केले.
- दरम्यान जनता दलाच्या 2 सरकारांनी कार्य केले. एच. डी. देवेगोडा व आय. के. गुजराल.
- लोकसभेच्या अध्यक्षांचा पदावधी सदस्याइतका असतो.

**लोकसभेच्या अध्यक्षांना पुढील अधिकार**

1) भारताची घटना
2) लोकसभेचे कार्यपध्दती नियम
3) संसदीय संकेत / परंपरा

- लोकसभेच्या अध्यक्षांना व्यापक नियमनात्मक, प्रशासकीय व न्यायिक अधिकार देण्यात आले आहेत.
- अध्यक्ष लोकसभेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भुषवितात. लोकसभेच्या कामकाजाचे नियमन करुन तेथे सुव्यवस्था व सभ्यता राखणे हि प्राथमिक जबाबदारी आहे.
- त्यांना सभागृहात भारताची घटना, कार्यपध्दती नियम व संसदीय परंपरेचा अंतिम अर्थ लावण्याचा हक्क आहे.
- संसदेच्या दोन्ही सभागृहांचे अध्यक्षस्थान भुषवितात.
- 52 व्या घटनादुरुस्तीनुसार पक्षांतराच्या कारणांमुळे लोकसभेच्या सदस्यांचा अपात्रतेबद्दलचा निर्णय देण्याचा अधिकार आहे.
- लोकसभेतील सर्व संसदीय समित्यांच्या अध्यक्षांची नेमणुक लोकसभेचे सदस्य करतात.
- लोकसभेचे अध्यक्ष हे स्वत: 1) व्यवसाय सल्लागार समिती 2) सामान्य उद्देश समिती इ. अध्यक्ष म्हणून कार्य.
- लोकसभेचे अध्यक्ष 1949 मध्ये स्थापन भारतीय संसदीय गटाचे पदसिध्द अध्यक्ष म्हणून कार्य करतात.

**लोकसभेच्या अध्यक्षांचे स्वातंत्र्य व निपक्षपातीपणा**

- त्यांना पदावधी सुरक्षा प्रदान करण्यात आले.
- त्यांचे पगार, भत्ते संसदेमार्फत ठरवले जातात.
- त्यांना नि:पक्ष बनविण्यासाठी सभागृहातील मतदानाच्या पहिल्या फेरीत मतदान करण्याचा अधिकार त्यांना नाही.
- त्यांना श्रेठत्व अनुक्रमामध्ये वरचे स्थान आहे. त्यांचा 7 वा क्रमांक असून भारताच्या सरन्यायाधीचा बरोबरीचा दर्जा
- हा दर्जा पंतप्रधान, उपपंतप्रधान वगळता इतर कॅबिनेट मंत्र्यापेक्षा वर आहे
- कलम 94 तरतुदीनुसार जुन्या लोकसभेच्या विर्सजनानंतर जेव्हा नवीन लोकसभेत हंगामी सभापती नवीन सदस्यांना शपथ देतात. 'अध्यक्ष प्रोटेम' म्हणून त्यांना 1) नवीन लोकसभेचा पहिल्या बैठकिचे अध्यक्ष स्थान भूषवितात 2) नवीन अध्यक्षांची निवडणूक घडवून आणणे. 2) हे पद तात्पुरते आहे.

**लोकसभेचा उपाध्यक्ष**

- कलम 93 नुसार निवडणुक
- लोकसभेच्या कालावधी इतका पदावधी असतो.
- अधिकार - लोकसभेत बोलण्याचा भाग घेणे,
- अध्यक्षांचे पद रिक्त असेल तर अध्यक्षांची कर्तव्य पार पडतात.
- अध्यक्ष गैरहजर असेल तर कार्य करतात
- हे दोघेही गैरहजर असेल तर अध्यक्षीय पॅनेलमधील एक सदस्य कार्य करतो.

**मर्यादा**

- अध्यक्ष म्हणून काम करताना ते मतदान करु शकत नाहीत.
- उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्याचा ठराव लोकसभेत विचाराधीन असताना ते हजर राहू शकतात मात्र कामकाजात बोलण्याचा, भाग घेण्याचा, मतदान करण्याचा अधिकार नाही.
- अध्यक्ष व उपाध्यक्षांना शपथ घ्यावी लागत नाही.
- 10 व्या लोकसभेपर्यंत अध्यक्ष, उपाध्यक्ष सरकारी पक्षातील असत. मात्र 11 व्या लोकसभेपासून अध्यक्षपद - सरकारी पक्षाला / युतीला, उपाध्यक्षपद - मुख्य विरोधी पक्षाला देण्यात आले.
- भारतात यांची निर्मिती 1921 मध्ये भारतीय परिषदांचा कायदा 1919 तरतूदीनुसार करण्यात आला.
- लोकसभेच्या कार्यपध्दती नियमांतर्गत अध्यक्ष लोकसभेच्या सदस्यांमधून महत्तम 10 व्यक्तींची नियुक्ती अध्यक्षीय पॅनेल वर करतात.

**भारतातून लोकसभेवर सदस्य निवडून देणारे राज्य व सदस्यसंख्या**

| क्र. | राज्याची नावे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| 01. | सिक्कीम | 01 |
| 02. | मिझोराम | 01 |
| 03. | नागालॅंड | 01 |
| 04. | मणिपूर | 02 |
| 05. | मेघालय | 02 |
| 06. | त्रिपुरा | 02 |
| 07. | गोवा | 02 |
| 08. | अरुणाचल प्रदेश | 02 |
| 09. | हिमाचल प्रदेश | 04 |
| 10. | उत्तराखंड | 05 |
| 11. | हरियाणा | 10 |
| 12. | छत्तीसगढ | 11 |

| क्र. | राज्याची नावे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| 13. | पंजाब | 13 |
| 14. | झारखंड | 14 |
| 15. | आसाम | 14 |
| 16. | तेलंगणा | 17 |
| 17. | केरळ | 20 |
| 18. | ओरिसा | 21 |
| 19. | आंध्रप्रदेश | 25 |
| 20. | राजस्थान | 25 |
| 21. | गुजरात | 26 |
| 22. | कर्नाटक | 28 |
| 23. | मध्यप्रदेश | 29 |
| 24. | तामिळनाडू | 39 |
| 25. | बिहार | 40 |
| 26. | पश्चिम बंगाल | 42 |
| 27. | महाराष्ट्र | 48 |
| 28. | उत्तरप्रदेश | 80 |

**भारतातून लोकसभेवर सदस्य निवडून देणारे केंद्रशासित प्रदेश व सदस्य संख्या**

| क्र. | केंद्रशासित प्रदेशाची नावे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| 01. | दिल्ली | 07 |
| 02. | जम्मू काश्मीर | 05 |
| 03. | लडाख | 01 |
| 04. | दिव दमण व दादर नगर हवेली | 02 |
| 05. | चंदीगड | 01 |
| 06. | पाँडेचेरी | 01 |
| 07. | लक्षद्विप | 01 |
| 08. | अंदमान निकोबार | 01 |

**लोकसभेचे सभापती 1952-2023**

| क्र. | लोकसभा सभापती | कालावधी |
|---|---|---|
| 01. | ग.वा. माळवणकर | 1952-1956 |
| 02. | एम.ए. आय्यंगार | 1956-1957, 1957-1962 |
| 03. | सरदार हुकूमसिंग | 1962-1967 |
| 04. | निलम संजीव रेड्डी | 1967-1969 |
| 05. | जी.एस. धिंग्रा | 1969-1971, 1971-1975 |
| 06. | बळीराम भगत | 1975-1977 |
| 07. | निलम संजीव रेड्डी | (मार्च - जुलै 1977) |
| 08. | के.एस. हेगडे | 1977-1980 |
| 09. | बळराम जाखड | 1980-1989 |
| 10. | रवि रे | 1989-1991 |
| 11. | शिवराज पाटील चाकुरकर | 1991-1996 |
| 12. | पी.ए. संगमा | 1996-1998 |
| 13. | जी.एस.सी. बालयोगी | 1998-2002 |
| 13. | मनोहर जोशी | 2002-2004 |
| 14. | सोमनाथ चॅटर्जी | 2004-2009 |
| 15. | मीरा कुमार | 2009-2014 |
| 16. | सुमित्रा महाजन | 2014-2019 |
| 17. | ओम बिर्ला | 7 जुन, 2019 ते आजपर्यंत |

- **लोकसभेचे उपाध्यक्ष होऊन अध्यक्ष झालेले -**
  1. एम. ए. अय्यंगार
  2. शिवराज पाटील
- **लोकसभेचे सर्वाधिक काळ अध्यक्ष -** ग. वा. माळवणकर
- **लोकसभेचे दोन वेळा अध्यक्ष झालेले -**
  1. एम. ए. अय्यंगार
  2. निलम संजीव रेड्डी
  3. जी. एस. धिंग्रा
  4. बलराम जाखड
  5. जी. एम. सी. बालयोगी
- **लोकसभेचे सर्वाधिक कमी काळ अध्यक्ष -** निलम संजीव रेड्डी
- **बिनविरोध निवडून आलेले एकमेव महिला अध्यक्ष -** मिरा कुमार
- **लोकसभेच्या महिला अध्यक्ष -**
  1. मिरा कुमार
  2. सुमित्रा महाजन
- **रचनेची तरतुद कलम 80 मध्ये**
- राज्यसभेची महत्तम सदस्यसंख्या - 250 तर सध्या 245 आहे. 238 राज्ये व के. प्रदशांचे प्रतिनिधी; तर 225 राज्यांचे व 8 के. प्रदेशांचे प्रतिनिधी आहेत. 12 सदस्य राष्ट्रपतीमार्फत निर्देशित केली जातील, तर सध्या 12 नामनिर्देशित सदस्य आहेत.

**राज्याचे प्रतिनिधीत्व**

- राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये विधानसभेतील नामनिर्देशित सदस्य, व विधान परिषेदेचे सदस्य भाग घेत नाहीत.
- उत्तरप्रदेशाचे 31 सदस्य, गोवा, पूर्वोत्तर (आसाम सोडून) प्रत्येकी एक सदस्य राज्यसभेत आहे. महाराष्ट्र - 19 प्रतिनिधी
- अमेरिकेच्या वरिष्ठ सभागृह असलेल्या सिनेटमध्ये सर्व राज्यांचे समान प्रतिनिधीत्व असून 50 राज्यांना प्रत्येकी 2 एकुण 100 सदस्यसंख्या आहे.

- ऑगस्ट 2003 मध्ये संसदेने लोकप्रतिनिधीत्व कायदा 2003 सुधारित करुन राज्यसभेच्या निवडणूकीसाठी गुप्त मतदान पध्दती जागी खुल्या मतदान पध्दतीची तरतुद केली आहे.

**केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधीत्व -**

- अप्रत्यक्षपणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मताद्वारे निवडूण दिले जातात.
- आता केवळ दिल्ली (3), पुदूचेरी (1) व जम्मू काश्मीर (4) या केंद्रशासित प्रदेशांनाच राज्यसभेचे प्रतिनिधीत्व आहे.

**नामनिर्देशित सदस्य -**

- राष्ट्रपतींना साहित्य, शास्त्र, कला व समाजसेवा या क्षेत्रातील विशेष ज्ञान/व्यवहारीक अनुभव असलेल्या 12 व्यक्तींना राज्यसभेवर नामनिर्देशित करण्याचा अधिकार आहे.

**राज्यसभेचा कालावधी**

- राज्यसभा हे संसदेचे स्थायी सभागृह असून ते विसर्जित केले जात नाही.
- त्याचे $\frac{1}{3}$ सदस्य 2 वर्षांनी निवृत्त होतात.
- निवृत्त सदस्यांच्या जागेसाठी दर 2 वर्षांनी निवडणूक होते व निवृत्त झालेला सदस्यपण भाग घेऊ शकतो.
- लोक प्रतिनिधीत्व कायदा 1951 याने राज्यसभेच्या सदस्यांचा पदावधी 6 वर्षे इतका आहे.

**राज्यसभेचे सभापती**

- राज्यसभेच्या पीठासीन अधिकाऱ्यांस सभापती म्हणतात.
- घटनेच्या कलम 89 नुसार, भारताचा उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध सभापती असतो.
- राज्यसभेच्या सभापतींना त्यांच्या पदावरुन सभापती या नावाने दूर करता येत नाही. त्यांना उपराष्ट्रपती म्हणून पदावरुन दूर करण्यात आल्यासच राज्यसभेचे सभापती म्हणून दुर केले जाते.

**अधिकार व कार्ये**

- एखादे विधेयक धन आहे की नाही हे ठरविण्याचा अधिकार अध्यक्षांचा असतो. व त्यांचा निर्णय अंतिम असतो.

**सभापती पदाबद्दल**

- राज्यसभेचे सभापती हे राज्यसभेचे सदस्य नसतात.
- सभापतींना राज्य सभेत मतदानाचा अधिकार नाही.
- ज्यावेळी सभापतींना पदावरुन दूर करण्याचा ठराव राज्यसभेत विचाराधीन असतो त्यावेळी सभागृहाचे पीठासीन अधिकारी म्हणून कार्य करु शकत नाहीत.

**पगार व भत्ते**

- संसदेने ठरल्याप्रमाणे पगार व भत्ते मिळतात.

**राज्यसभेचे उपसभापती**

- कलम 89 अनुसार तरतुद

**कार्य व अधिकार**

- राज्यसभेचे सभापती अध्यक्षस्थान भुषवितात. तर उपसभापती सदस्यासारखेच असतात.
- राज्यसभेत बोलण्याचा अधिकार आहे.
- सभापतीचे पद रिक्त असल्यास, सभापती गैरहजर असल्यास उपसभापतीचे कार्य असते.

**राज्यसभेचे उपअध्यक्षीय पॅनल**

- राज्यसभेच्या कार्यपध्दती नियमांतर्गत, सभापती राज्यसभेच्या सदस्यांमधून महत्तम 10 व्यक्तींची नियुक्ती उपअध्यक्षीय पॅनेल म्हणून करतात.
- सचीवालयाचे प्रमुख महासचिव हे असतात. त्यांची नेमणुक सभागृहाच्या पीठासीन अधिकाऱ्यामार्फत केली जाते.

**संसदीय समस्या**

- संसदेला कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवण्याचे (कार्य) कर्तव्य प्रभावीपणे पार पाडता येण्यासाठी विविध समित्यांची निर्मिती केली जाते. या पध्दतीला समिती व्यवस्था म्हटले जाते.
- भारताच्या घटनेत संसदीय समितीचा उल्लेख केलेला. मात्र रचना, कालावधी, कार्ये इ. तरतूद नाही.
- संसदीय समिती ही एक अशी समिती आहे -

1) जिची नेमणुक / निवडणूक सभागृहामार्फत / नामनिर्देशन अध्यक्ष/ सभापती मार्फत केले जाते.
2) जो अध्यक्ष/सभापती यांच्या निर्देशाखाली कार्य करते.
3) जो आपला अहवाल सभागृहाला किंवा अध्यक्ष/सभापतीला सादर करते.
4) जिला लोकसभा/राज्यसभा सचिवालयामार्फत सचिवालयाची सेवा उपलब्ध करुन दिली जाते.



**भारतातून राज्यसभेवर सदस्य निवडून देणारे राज्य व सदस्य संख्या**

| क्र. | राज्याची नावे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| 01. | मणिपूर | 01 |
| 02. | मेघालय | 01 |
| 03. | मिझोराम | 01 |
| 04. | नागालँड | 01 |
| 05. | सिक्कीम | 01 |
| 06. | त्रिपुरा | 01 |
| 07. | गोवा | 01 |
| 08. | अरुणाचल प्रदेश | 01 |
| 09. | हिमाचल प्रदेश | 03 |
| 10. | उत्तराखंड | 03 |
| 11. | हरियाणा | 05 |
| 12. | छत्तीसगढ | 05 |

| क्र. | राज्याची नावे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| 13. | झारखंड | 06 |
| 14. | आसाम | 07 |
| 15. | पंजाब | 07 |
| 16. | तेलंगणा | 07 |
| 17. | केरळ | 09 |
| 18. | राजस्थान | 10 |
| 19. | ओरिसा | 10 |
| 20. | गुजरात | 11 |
| 21. | मध्यप्रदेश | 11 |
| 22. | आंध्रप्रदेश | 11 |
| 23. | कर्नाटक | 12 |
| 24. | पश्चिम बंगाल | 16 |
| 25. | बिहार | 16 |
| 26. | तामिळनाडू | 18 |
| 27. | महाराष्ट्र | 19 |
| 28. | उत्तरप्रदेश | 31 |

**भारतातून राज्यसभेवर सदस्य निवडून देणारे कें.प्रदेश व सदस्य संख्या**

| क्र. | केंद्रशासित प्रदेशाचे नावे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| 01. | दिल्ली | 03 |
| 02. | जम्मू-काश्मीर | 03 |
| 03. | लडाख | 01 |
| 04. | पाँडेचेरी | 01 |

**राज्यसभेचे अध्यक्ष 1952-2023**

| क्र. | राज्यसभा अध्यक्ष | कालावधी |
|---|---|---|
| 01. | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन | 1952-1962 |
| 02. | डॉ. झाकीर हुसेन | 1962-1967 |
| 03. | व्ही.व्ही. गिरी | 1967-1969 |
| 04. | गोपाल स्वरुप पाठक | 1969-1974 |
| 05. | बी.डी. जत्ती | 1974-1979 |
| 06. | महम्मद हिदायतुल्ला | 1979-1984 |
| 07. | आर. व्यंकटरामन | 1984-1987 |
| 08. | डॉ. शंकर दयाळ शर्मा | 1987-1992 |
| 09. | डॉ. के.आर. नारायणन् | 1992-1997 |
| 10. | डॉ. कृष्णकांत | 1997-2002 |
| 11. | भैरवसिंह शेखावत | 2002-2007 |
| 12. | डॉ. हमीद अन्सारी | 2007-2012 |
| 13. | डॉ. हमीद अन्सारी | 2012-2017 |
| 14. | व्यंकय्या नायडू | 2017-2022 |
| 15. | जगदिप धनखड | 11 ऑगस्ट, 2022-आजपर्यंत |

**संसद सभागृहाच्या इतर तरतुदी**

**लोकसभेचा हंगामी अध्यक्ष -**

- लोकसभेत निवडून आलेल्या सदस्यापैंकी सर्वात जेष्ठ सदस्य राष्ट्रपती लोकसभेचा हंगामी अध्यक्ष म्हणून नेमणूक करतो व लोकसभेच्या सदस्यांत्वाची शपथ देतात. या अध्यक्षाची कार्ये पुढील प्रमाणे.

1. लोकसभेच्या पहिल्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे
2. लोकसभेत निवडून आलेल्या सर्वच निर्वाचित सदस्यांना शपथ देणे.
3. नवीन अध्यक्षांची निवडणूक घडवून आणणे.

- 16 व्या लोकसभेचे हंगामी अध्यक्ष कमलनाथ हे होते.
- 17 व्या लोकसभेचे हंगामी अध्यक्ष डॉ. विरेंद्र कुमार हे होते.

**विरोधी पक्ष नेता -**

- संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये विरोधी पक्षनेत्याची नेमणुक केली जाते.
- सभागृहाच्या एकुण सदस्यसंख्येच्या 1/10 जागा मिळविणाऱ्या पक्षाला विरोधी पक्षाची मान्यता मिळते.
- 1969 मध्ये पहिल्यांदा विरोधी पक्ष नेता या पदास मान्यता देण्यात आली.
- 1977 मध्ये या पदास वैधानिक दर्जा देऊन कॅबिनेट मंत्र्याचाही दर्जा देण्यात आला.
- **गणसंख्या पूर्ती -** दोन्ही सभागृहातील गणसंख्यापूर्ती ठरविण्याचा अधिकार त्या सभागृहाच्या सभापतीला असून एकुण सदस्य संख्येच्या 1/10 ही गणसंख्या निश्चित करण्यात आलेली असून. लोकसभा - 55, राज्यसभा - 25. (अध्यक्षासह)
- **संसदेची कामकाजाची भाषा -** कलम 120 नुसार संसदेतील कामकाज हिंदी आणि इंग्रजीतून चालविण्यात येते. नंतर कार्यालयीन भाषा कायदा 1963 अन्वये इंग्रजी भाषेचा वापर हिंदीबरोबर चालू ठेवण्याची संमती देण्यात आली आहे.

**संसदेचे दैनंदिन कामकाज -**

**प्रश्नोत्ताराचा तास - 11 ते 12**

- **तारांकित प्रश्न -** हे प्रश्न मौखिक स्वरुपाचे असून एका दिवशी एकापेक्षा जास्त प्रश्न सदस्य विचारु शकत नाहीत. महत्तम 20 प्रश्न एका दिवसात विचारता येतात. हे प्रश्न हिरव्या कागदावर छापली जातात.
- **अतारांकित प्रश्न -** हे प्रश्न लिखित स्वरुपात असून एका दिवशी महत्तम 5 प्रश्न विचारु शकतात आणि जास्तती जास्त एका दिवसात 230 प्रश्न विचारता येतात. हे प्रश्न पांढऱ्या कागदावर छापली जातात. प्रश्नावर आधारित उपप्रश्न विचारता येतात.

40/71

- **अल्पसुचना प्रश्न** - मंत्र्यांनी संबंधित पिठासीन अधिकाऱ्याकडे पूर्वसूचना देऊन परवानगी मिळवावी लागते. एका दिवसात 10 प्रश्न विचारता येतात.

**शून्य काळ (दुपारी 12 ते 1) -**

- भारतीय संसदेच्या कामकाजाच्या एक भाग म्हणून 1962 पासून शून्य काळ ही परंपरा सुरु झाली. कोणतीही पूर्वसुचना न देता दैनंदिन चालू असलेल्या घडामोडीवर सदस्य हे प्रश्न सभागृहाला विचारु शकतात.

**दुपारेच सत्र (2 ते 6) -**

**संसदेतील प्रस्ताव**

- संसदेत सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणण्यासाठी मांडलेला विचार म्हणजेच प्रस्ताव किंवा सभागृहाचे मत किंवा निर्णय प्रकट करण्याचे साधण म्हणजेच प्रस्ताव.
- **महत्त्वपूर्ण प्रस्ताव** - सदनाच्या मान्यतेसाठी एखादा महत्त्वाचा विषय मांडून स्वंतत्र व स्वयंपूर्ण रित्या मंजूर करून घेतला जातो. उदा - अविश्वास ठराव, राष्ट्रपतीच्या अभिभाषाणाबद्दल आभार
- **पर्यायी प्रस्ताव** - मूळ प्रस्तावाच्या जागी एखादा सदस्य त्याच विषयाला अनुसरून जो प्रस्ताव मांडतो त्याला पर्यायी प्रस्ताव असे म्हणतात.
- **पुरक प्रस्ताव** - हे प्रस्ताव दुसऱ्या प्रस्तावावर अवलंबून असतात व सदनातील अन्य कार्यवाहीशी संबंधित असतात.
  उदा. अनुसंधिक प्रस्ताव, वेळ काढू प्रस्ताव, फेरबदल प्रस्ताव
- **स्थगन प्रस्ताव -**

1. हा प्रस्ताव सकाळी दहा पूर्वी अध्यक्ष मंत्री किंवा महासचिव यांना आपण स्थगन प्रस्ताव मांडणार आहोत अशी सूचना द्यावी लागते.
2. या प्रस्तावाला सदनामध्ये चालू असलेले कामकाज थांबवून सार्वजनिक महत्त्वाच्या मुद्यावरील चर्चेसाठी सभागृहात मांडला जातो.
3. हा स्थगन प्रस्ताव चर्चेसाठी सभागृहाची संमती आवश्यक असते. त्यासाठी किमांन 50 सदस्यांचा पाठिंबा व साधारणत: चर्चा अडीच तास चालते.

- **कटौती प्रस्ताव** - सभागृहातील चालू असेललेली चर्चा किंवा प्रश्न थांबविण्यात यावा अशा आशयाचा एखादी सदस्य कटौती प्रस्ताव मांडू शकतो. या प्रस्तावाचे चार प्रकार पडतात -

1. **साधारण कटौती** - महत्त्वाच्या मुद्दांवर पुरेशी चर्चा झाली असून त्यावर मतदान घेण्यात यावे.
2. **घटकनिहाय कटौती** - चर्चेपूर्वी एखाद्या विधेयकाचे गटामध्ये विभाजन करून चर्चा झाल्यानंतर मतदानास टाकला जातो.
3. **कागांरू कटौती** - केवळ महत्त्वाच्या तरतूदीची चर्चा व मतदान घेण्यासाठी हा प्रस्ताव मांडला जातो.
4. **गिलोटिन कटौती** - वेळेअभावी ज्यावर चर्चा केली गेली नाही असे विधेयक चर्चेसाठी घेतले जाते.

- **लक्षवेधी प्रस्ताव -**

1. या प्रस्तावाची मूळ भारतीय संकल्पना असून इ. स. 1954 पासून वापर केला जातो.
   उद्देश - सार्वजनिक महत्त्वाच्या विषयाकडे संबंधित मंत्र्याचे लक्ष वेधने.
2. हा प्रस्ताव एक दिवस अगोदर सूचना देवून मांडवा लागतो.
3. या प्रस्तावाच्या अनुषंगाने दोन पेक्षा अधिक लक्षवेधी सूचना देता येत नाही.

- **निंदा प्रस्ताव -**

1. हा प्रस्ताव दोन्ही सभागृहात स्विकारला जातो.
2. हा प्रस्ताव स्विकारण्याची गरज असते.
3. एक मंत्री काही मंत्री किंवा संपूर्ण मंत्रीमंडळा विरोधात मांडता येतो.
4. सरकारच्या विशिष्ट धोरणावर किंवा कृतीवर टिका करण्यासाठी मांडला जातो.
5. हा प्रस्ताव संमत झाला तर मंत्रिमंडळाने राजीनामा द्यावा अशी अपेक्षा असते जी पूर्ण होत नाही.

- **धन्यवाद प्रस्ताव -**

1 राष्ट्रपतीच्या अभिभाषणानंतर दोन्ही सदनामध्ये स्वतंत्ररित्या अभिभाषणांवर चर्चा करण्यासाठी मांडला जातो.

2 या प्रस्तावाच्या चर्चेला पंतप्रधानामार्फत उत्तर दिले जाते व नंतर मतदानास प्रस्ताव ठेवला जातो.

3. हा प्रस्ताव संमत होणे गरजेचे असते अन्यथा सरकार पराभूत झाले असे माणण्यात येते.



- **अविश्वास प्रस्ताव -**

1. अविश्वास ठरावाची घटनेत तरतूद दिलेली नाही. परंतू लोकसभा नियम 198 मध्ये त्याची तरतूद केलेली आहे.
2. अविश्वास दर्शक ठराव विरोधी पक्षामार्फत मांडला जातो.
3. अविश्वास दर्शक ठराव मांडण्यसाठी किमान 50 सदस्यांचे समर्थन आवश्यक असते.
4. अविश्वास ठरावावर चर्चा करण्यासाठी कामकाज सल्लागार समिती कडून वेळ निश्चित केला जातो.
5. अविश्वास प्रस्तावाच्या अनुशंगाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर पंतप्रधानच देतात.
6. हा ठराव मंजूर झाल्यास पंतप्रधान व मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

**संसदेचे कार्य -**

- **कायदेविषयक -**
- **विधेयक** - कायद्याचा कच्चा आराखडा

- **विधेयकाचे प्रकार** - सामान्य विधेयक, धनविषयक विधेयक, घटनादुरूस्ती विधेयक.
- **सामान्य विधेयक** - पैशासी संबंधित नसलेले विधेयक

**वैशिष्ट्ये -**

1. हे विधेयक प्रथम कोणत्याही सभागृहात मांडता येते.
2. या विधेयकाबाबात दोन्ही सभागृहांनी स्वतंत्र मान्यता न दिल्यास संयुक्त अधिवेशन बोलावले जाते.
3. संसदेच्या सभागृहाने हे विधेयक मंजुर करून राष्ट्रपतीकडे पाठविल्यास राष्ट्रपती त्यास मान्यता देतात.

- **धनविषयक विधेयक -**

**वैशिष्ट्ये -**

1. हे विधेयक प्रथम लोकसभेतच मांडले जाते.
2. हे विधेयक राष्ट्रपतीच्या पुर्वपरवानगी शिवाय सभागृहात प्रथम मांडता येत नाही.
3. हे विधेयक सरकारी असल्यामुळे मंत्रीच मांडतात.
4. हे विधेयक धनविषयक आहे किंवा नाही हे लोकसभेचे अध्यक्ष ठरवितात.
5. धनविषयक विधेयक लोकसभेने मंजूर करून राज्यसभेकडे पाठविल्यास राज्यसभेस त्यास 14 दिवसाच्या आत मंजुरी द्यावी लागते. संयुक्त अधिवेशनाची तरतुद नाही.
6. हे विधेयक राष्ट्रपतीकडे मंजुरीसाठी पाठविल्यास त्यांना मंजूरी द्यावीच लागते.

- **घटना दुरूस्ती विधयेक -**

1. हे विधेयक प्रथम कोणत्याही सभागृहात सादर करतात.
2. या विधेयका बाबत दोन्ही सभागृहाने स्वतंत्र मान्यता द्यावी लागते.
3. संयुक्त अधिवेशनाची या विधेयकाबाबत तरतूद नाही.
4. या विधेयकाला संसदेने मंजूर करून राष्ट्रपतीकडे पाठविल्यास राष्ट्रपतीस त्यास मंजूरी द्यावीच लागते. (24 वी घटना दुरूस्ती 1971)

- **कार्यकारी विषयक अधिकार -**

1. कार्यकारी मंडळ हे संसदेला जबाबदार असते.
2. संसद अनेक मार्गाने कार्यकारी मंडळावर नियंत्रण प्रस्थापित करते. उदा - प्रश्न उत्तराचा तास, शुन्य प्रहार, विविध प्रस्ताव, यांच्या मार्फत नियंत्रण प्रस्थापित करणे.

- **अर्थविषयक अधिकार -**

1. धनविषयक विधेयक व वित्तीय विधेयक यांना मान्यता देण्याचा संसदेस अधिकार आहे.
2. अर्थसंकल्प मंजूर करून वित्त वर्षातील खर्च व कर आकारने याबाबत सरकारला सल्ला देणे.
3. संसद आपल्या वित्तीय समितीच्या मार्फत सत्ताधारी सरकारच्या जमा खर्चाचे परिक्षण करते.

- **न्यायविषयक अधिकार -**

1. संसद सर्वोच्च न्यायाधीशांची सदस्यसंख्या वेळोवेळी निश्चित करते.
2. संसद एक किंवा दोन राज्यांसाठी एका उच्च न्यायालयाची स्थापना करते.
3. सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची वेतनभत्ते निश्चित करते.

- **निवडणुक विषयक अधिकार -**

1. संसदेचे सदस्य राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा - राज्यसभा सभापती व उपसभापती, यांच्या निवडणूकीमध्ये सहभागी होवून निवड करतात.

- **महाभियोग खटलाविषयक अधिकार -**

1. संसद राष्ट्रपती, सर्वोच्च उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, मुख्य निवडूणक आयुक्त, भारताचा महालेखा परिक्षक, यांना पदावरून दूर करण्यासाठी महाभियोगाचा खटला चालवितात.
2. हा खटला चालविण्यापूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या 1/4 सदस्यांनी लेखी निवेदन सभापतीकडे दिल्यास 14 दिवस अगोदर पूर्व सूचना देऊन ठराव सभागृहात मांडला जातो.
3. दोन्ही सभागृहाने 2/3 विशेष बहूमताने ठराव मंजूर केल्यास संबंधित व्यक्तीला पदावरून दूर केले जाते.

**संसदेचे इतर अधिकार -**

- राष्ट्रपतींनी आणिबाणी घोषित केल्यास त्यास मान्यता देणे. राष्ट्रीय आणिबाणी घोषित केल्यास एक महिन्याच्या आत व घटनात्मक आणिबाणी व आर्थिक आणिबाणी जाहीर केल्यास दोन महिन्याच्या आत संसदेला मान्यता द्यावी लागते. अन्यथा आणिबाणी रद्द होते. आणिबाणी सुरू ठेवणे, कार्यकाळ वाढविणे किंवा स्थगित करणे हा अंतिम अधिकार संसदेला आहे.
- दोन किंवा अधिक राज्यांसाठी एका सामाईक उच्च न्यायालायाची स्थापना करणे.
- सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे संघटन अधिकार क्षेत्र व कामकाजाचे नियम ठरवून देणे.
- घटक राज्याची व केंद्रशासित प्रदेशाची स्थापना करण्याबरोबर त्याची क्षेत्र सीमा, नावात बदल करणे.

42/71

# संसदीय समित्या

- 1) स्थायी समिती
  - 1) वित्तीय समिती
    - 1) लोकअंदाज समिती
      - स्थापना - 1921
      - सदस्य - 25 (1956 - सदस्य 30)
    - 2) सार्वजनिक उपक्रम समिती
      - स्थापना - 1964
      - सदस्य - 15
      - (1974 - सदस्य 22. लोकसभा 15 व राज्यसभा 7)
    - 3) लोकलेखा समिती
      - स्थापना - 1921
      - सदस्य - 22
      - (लोकसभा 15 व राज्यसभा 7)
  - 2) विभागीय समित
  - 3) इतर संसदीय समिती
    - 1) कामकाज सल्लगार समिती
    - 2) खाजगी सदस्यांची विधेयक व अधिनियम संबंधी समिती
    - 3) शासकीय आश्वासनासंबंधी समिती
    - 4) अधिनस्त कायदेविषयक समिती
    - 5) याचिका समिती
    - 6) विशेषअधिकार समिती
    - 7) नियम समिती
    - 8) सामान्य प्रयोजन समिती
    - 9) सभागृह समिती
    - 10) सदस्यांचा अनुपस्थितीविषयक समिती
    - 11) सदस्यांचे वेतन व भत्तेविषयक संयुक्त समिती
    - 12) लाभाच्या पदाविषयक संयुक्त समिती
    - 13) लायब्ररी समिती
    - 14) सभागृहपटलावर ठेवण्यात येणाया कागदपत्र समिती
    - 15) आचरण समिती
    - 16) अनुसूचित जाती व जमाती कल्याण समिती
    - 17) महिला सबलीकरण विषयक समिती
- 2) तदर्थ समिती
  - 1) चौकशी समिती
  - 2) सल्लागार समिती